म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं.

. GODSE

. 1905.)

*DEALERS IN STATIONERY OF*

*EVERY DESCRIPTION,*

DRAWING MATERIALS, TOILET REQUISITES,

SUNDRIES, HOSIERY, HABERDASHERY,

ACCOUNT BOOKS, SCHOOL BOOKS,

TOWELS, BED SHEETS, BISCUITS,

CLOTH, PAPERS, CUTLERY,

UMBRELLAS AND FANCY

GOODS ETC.

REFBK-0000284
REFBK-0000284

VAR PETH.

*POONA CITY.*

2l8
REFBK-0000284
REFBK-0000284

॥ वंदेमातरम् ॥

# मुलांमुलींचा समर्थ मेळा.

पद १ लें

काय मागुं तुजपाशीं । गणेशा ॥ ध्रु० ॥
भारताचा रवि अस्ता गेला । दुर्घरतम हा ह्मणें तूं नाशी ॥ १ ॥ गंगाधर सुत बलवंतातें । जन्म देई पुनरपि या देशीं ॥ २ ॥ स्वराज्य माझा जन्मासिद्ध वर । सानुकंप हो देतो मजसी ॥ ३ ॥

पद २ रे

कींव कशी आमुची येइना दयाळा । फांस हा गळ्याला ॥ लागला अम्हांला । तारी प्रभो दीन हीन अज्ञ लेंकरें हीं कृपाळा ॥ध्रु॥ दास्यपंकजीं रुतलों। शौर्यातें विस्मरलों । कितीक अंत बघसी प्रभो सत्वरीं धांवरे दयाळा ॥ १ ॥ जगवत्सल नाम तुझें । सकल अवनिवरिं गाजें । वत्सलता कां न प्रभो तुमची ती दावितां आम्हांला ॥ ३ ॥

पद ३ रें

घ्या माल स्वदेशांतील । विदेशी । करा बंद व्यापार ।
सरकार तागडीवाले । उद्देशानें ह्या आले ।
परि मालक मागुनि बनले ।
हे पुरे विदेशी चोज अतां तरी । करा बंद व्यापार ॥

व्यापारच जीवन त्यांचें । धन जाई हिंद भूमीचें ।
त्या परदेशी वस्तूंचें ।
अतां सोडि हा मोह । विदेशी । करा बंद व्यापार ॥
करी लुटि अल्लाउद्दिन । किति तरी लूट घेऊन ।
तो जाइ स्वदेशीं नि घून ।
परि साठ कोटी दरसाल नेति हा । करा बंद व्यापार॥
प्रत्येक पाऊला गणित । परदेशी वस्तू आणित ।
ही काय स्वदेशी रीत ।
बडबडणें हें नको विदेशी । करा बंद व्यापार ॥४॥
जरि जाड माल नावडतो।गिरणीचा मालहि घ्या तो।
परि हिंदुस्तानांतिल तो ।
विदेशी लूट बुडविणें मार्ग हा । करा बंद व्यापार ॥
जरि देशि माल ना सुबक । उत्तेजन देणें एक ।
मार्ग हा आपुला देख ।
होइल हळुंहळू तोच चांगला । करा बंद व्यापार ॥
झिरझिरीत कपडे सोड । घेइं हे जाडं भरडं ।
सत्वाची धरूनि चाड ।
हें खूळ विदेशि काढ अतां तरी । करा बंद व्यापार ।
खिलजीचा हल्ला आला । लुटलेंच हिंदभूमीला।
न्यायानें लुटती तुजला ।
कां अंध होसि बांधवा अतां तरी । करा बंद व्यापार ।

दुसऱ्यावर अवलंबून । ठेवलेंच हिंदुस्थान ।
व्यापारी कावा जाण ।
जें मिळे स्वदेशी तेंच घेई । हा । करा बंद व्यापार ।
त्या महाराष्ट्र केसरिचें।स्मारक हें जरि करण्याचें ।
तो तूं बोलबोलसी वाचे ।
दाखवी कृतीनें अतां आपुल्या । करा बंद व्यापार ।।
नमुनियां तिलक गांधीना । नमुनियां हिंद बंधूना ।
कारावासीं वीरांना ।
हो परदास्याच्या पार अतां तरी । करा बंद व्यापार ।।

पद ४ थें.

पुरें झाली घोड्याची रेस आतां ही ।। ध्रु० ।।
रेस कशाची ? सात जन्मिची खरी खरी दुष्मान् ।
अभेद्य साची हिची मोहनी करी नरा बेमान ।।१।।
मोह धनाचा पुरा पाडुनी रूप दावितें छान ।
पाशबद्ध नर होतां चिरतें चराचराचर मान ।। २ ।।
वेड हिचें लागतां कुणाला राहिन कसलें भान ।
रेसरणांगणीं निर्भय निघतो करि घेऊनि प्राण ।।३।।
छंद सारखा हिचा घेवुनी करुनि जिवाचें रान ।
संसाराला मुकती बुडाविती कुलकीर्ति सन्मान ।।४।।
बायां पोरें घरीं भुकेलीं रडुनि सोडिती प्राण ।
सोड नाद रेसाचा बांधवा ! अजुनि कैसा बेभान।।५।।

आर्यांचा तूं वंशज साचा धरिं कांहीं अभिमान ।
रेस खेळणें अनार्यरीती; वचन साच हें मान ॥६॥
सुवर्णभूमी तुझी तियेची रेस करी धुळधाण ।
रेस खेळुनी तिला कशाला करिसि असा हैराण ॥७॥
रेस-राक्षसी सदनीं शिरली लाथ तिला झणि हाण ।
स्वजनासाठीं देशासाठीं वाहि आपुले प्राण ॥ ८ ॥
ऐकिसि जरि उपदेश हिताचा नीट देवुनी कान ।
" देशोद्धारक " म्हणुनि सकलजन करिल तुझें
गुणगान ॥ ९ ॥

## पद ५ वें.

तो लाल हिंदभूमीचा । 'मोहन' । हो! कारावासीं॥ध्रु०॥
धन्य माहात्मा हिंदभूस लाभला गांधि योगी । सर्व
तयाचा मार्ग आचरूं नमूं तयासीं आधीं ॥ मोहन ॥
असहकार समशेर घेवुनी जनांपुढें आला । शांततत्त्व
आचरा आम्हांला हाच मार्ग हो कथिला॥२॥ साधि
रहाणी तपस्व्यापरी आचरि जो वीर । तोच महात्मा
हिंदभूमिचा होय सर्व आधार ॥३॥ वर्ष सहा जरि
शिक्षा होई आनंदें जाई । कारावासीं जावुनि आम्हां
राष्ट्रप्रेम हें शिकवी ॥४॥ लोकशाहिचा, लोकमताचा
सूर्य उगवला हो । मोहन लाला वंदन करूनी मार्ग
हाच आचरा हो ॥ ५ ॥

सं-क्र = २०१८

पद ६ वें.

नमु गांधि–टिळकाला । चमकत खुलवित करित सुशोभित स्वगुणें हिंदनभाला ॥ध्रु०॥ तिलक सूर्य जरि अस्ता गेला । गांधी । शशीवर आला । देश सुखें नटला । आतां सोडुनियां परभावा । भजूं जननीला॥१॥

पद ७ वें.

किति तरी बघतां अंत हा अजुनी देवा ॥ ध्रु० ॥ दासाच्या पंकीं देवा । नित्य बुडतसो ह्मणि धांवा करितसो तुझा हा धांवा । तारि त्वरित येवुनी पावा॥ १॥ वैभव तें सारें गेलें । शौर्य सकलही मावळलें । संकटीं पहा हे पडले । हाय ! सकल भक्ताचि धांवा ॥ २ ॥ वारुनिया दास्यत्वाचें । कृष्णग्रहण हें या देशाचें । दाखवी प्रभू । सौख्याचे । सुदिन सदय होवुनि देवा ॥ ३ ॥

पद ८ वें

तारि प्रभो विनती पद कमलीं ॥ ध्रु० ॥ दुःख हरुनि जनतेचें । दिन दावी सौख्याचे । हे वारि परक्यांचें । संकट तूं या कालीं ॥ १ ॥ ग्रहण पारतंत्र्याचें । त्वरित हरी हें साचें । ये हरी राष्ट्राचें । विघ्न प्रभो या कालीं ॥ २ ॥

पद ९ वें.

प्रभु याहो तारण्या । आमुच्या देशा । कुदशा ही आजि आली । शरण तुला दयाळा । याहो ॥ध्रु०॥

देवराया । सत्वरी या । छळ बघतां कासयां । श्रमली काया । जाइल वायां ॥ १ ॥ गांजिती हे । दैत्य पाहे । छळ आतां ना साहे । म्हणुनी सदया । धांवा क्षणें या ॥ याहो ॥ २ ॥

पद १० वें.

गांधींची खादी मोक्षा साधी । हृद्‌यीं धरा शरिरीं वरा ॥ ध्रु० ॥ वस्त्र विदेशीं तें मोलाचें । लावि घातुक वेड साचें । भरी तें उदरही इतरांचें । हरुनि स्वधना । बुडवि स्वजना । म्हणुनि त्वरा । करुनी तरा ॥ १ ॥ आर्यमनाच्या विमलपणाची । विमल खादी खूण साची । वदते वाणी गांधीची । जागवि मना । अजुनि सुजना । पथ साजिरा । राष्ट्रा वरा ॥ २ ॥ स्मरुनि देवा घ्या शपथेला । वापरा हो ! देशी माला । सूतानें जा स्वर्गाला । साधी खादी । बंद छंदी । वच हा खरा । हृद्‌यीं धरा ॥ गांधिची ॥ ३ ॥

पद ११ वें.

सोडवी धांव वनमाली । दास्याच्या जळतों अनलीं॥ दुःखाची सीमा झाली । जुलमाची खंती नुरली ॥ ( चाल ) खायासी न मिळें अन्न । नेसाया न मिळे वसन । जाहला जीव हैराण । सोडवी । आम्हां वांचवी । दया दाखवा । सदया वनमाली ॥ १ ॥

( पहिली चाल ) हे कोण पाहुणे आले यजमाना ढकलुनि दिधलें । पानावरि थाटुनि बसले ( चाल ) जाहले । पुष्ट हे भले । लावुनी लढ ।। धांव० २ ।। चोरांना मिळतो घांस । सावांना होई त्रास । होतसे तुरुंगींवास ( चाल ) हा काय । जाहला न्याय । नीतिचा हाय । धांव वनमाळी ।। ३ ।।

पद १२ वें.

भारतभू चिमणा गेला, सावळा बाळ तो निजला ।। ध्रु० ।। कष्टवून काया आपुली । जै भारत सेवा केली । ही जनता जणु हालविली । निद्रेंतुनि जागी केली । सत्वाची जाणिव दिधली जनतेला हातीं धरली ।

( चाल ):—कष्ट सर्वही साहूनी । जनतेसि देह वाहूनी । भारतभू सेवा करुनी । सद्‌गुणी बाळ तो निजला । वाचविण्या भूमातेला, बंदिवासही सोशियला । एकही पळ तो न बसला, रात्रंदिन कार्यीं रमला । मायदेश उज्वल केला, स्वातंत्र्य मार्ग दाखविला ।

(चाल):–' केसरी ' पत्र चालवुनी । जनिं ज्ञानामृत पाजूनी । उपदेश तयासी करुनी । लोकमान्य बाळची निजला ! । दिव्य तेज तें मावळलें, रवि-तेजामाजीं विरलें । वैराग्य सर्व तें सरलें, सत्याला

वाली नुरले । धैर्य वीर्य सर्वहि गळलें, राष्ट्राचें सत्वचि सरलें ।

( चाल ) देशकार्य धैर्यें करूनी । जनतेसि वेड लावूनी । सर्व ती तिलकमय करुनी । प्रियकर तो बाळचि निजला ! ।

पद १३ वें.

हाः हाः काय तुवा केलें मृत्यो दया नये कैशी ॥ध्रु०॥
बाळासाठीं नवस हजारों केले ना जगदीशा ।
हातें बांधित भावि मनोरे विफल जहाली आशा १
कुणाजवळ मी हितगुज बोलूं कर्मकथा सांगावी ! ।
कोण संकटीं धांवुन येइल अशी वेळ कां यावी २
कुणि न हिताचा कर्तृत्वाचा कर्णधार ना उरला ।
सौभाग्याचा तिलक हरपला पुण्यांश आजी सरला ३
किति आरडले, किति ओरडले, किती जरी मी रडलें ।
कृतांत काळा अंतक आपुलें नाम सार्थ तूं केलें ॥४॥
शून्य भासतें, उदास सारें, कांहीं सुचेना जीवा ।
नैराश्याचें पटल चहुंकडे कसा काळ कंठावा ॥५॥
दीन मुलें हीं प्रेमें वदतीं कुठें बाळ तो आई ।
हृदयस्पर्शी बोल ऐकतां भान हरपुनी जाई ॥६॥
सुपुत्र गेला जगूं कशाला मरण मज न कां येई ।
हितार्थ माझ्या बाळा वांचुनि कोण काळजी घेई ७

१२०४ ११०१८



## पद १४ वें.

हिंदच्या शूर वीरांनो ।सज्ज व्हा आत्म यज्ञाला।।ध्रु०।।
दुहीला पूर्ण होमूनी । करूं स्वाहा करूं स्वाहा ।।१।।
राष्ट्रमख वन्हिज्वालाहि। पसरवूं दूर विश्वांत ।।
हिंदिचें दुरित जाळाया। करूं स्वाहा०–।। २ ।।
अलौकिक यज्ञ ज्वालेनें । चकित होईल दुनियां ती ।
सकल सुर मुदित होतील । करूं स्वाहा०–।। ३ ।।
चिन्ह जें आत्मयज्ञाचें । विदेशीं वस्त्र मोलाचें ।
राष्ट्र-यागीं तया होमूं । करूं स्वाहा०–।। ४ ।।
लोकमान्यास तर्पाया । करूं पाणि स्वसौख्याचें ।
पिंड अर्पून प्राणांचें । करूं स्वाहा०–।। ५ ।।
हिंदचा तिलक राजा तो। हृदय सिंहासनीं बसवूं ।
तयाचें नांव गर्जोनी । करूं स्वाहा०– ।। ६ ।।
झुरे दास्यांत दुःखानें । बापुडी मायभूमीही ।
तियेच्या मुक्ततेसाठीं । करूं स्वाहा०–।। ७ ।।
पूर्ण स्वराज्य सौख्याला । भोगणें हक्क हा आपुला ।
पुन्हा तो पूर्ण मिळवाया । करूं स्वाहा०–।। ८ ।।
दिव्य आत्मा दिसे गगनीं । हिंदच्या बाळ तिलकाला ।
करी तो त्याच आज्ञेला । करा स्वाहा करा०–।।९।।
आपुल्या राष्ट्रभक्तिची । कसोटी ही असे साची ।
तियेला पूर्ण उतराया । करूं स्वाहा०–।। १० ।।

आपुल्या राष्ट्रसंग्रामीं । लागले नेत्र विश्वाचे ।
आर्य तेजास दावाया । करूं स्वाहा०—॥ ११ ॥
नमोनी मायभूमीला । नमोनी राष्ट्रभक्तांना ।
नमोनी टिळक-गांधींना । करूं स्वाहा करूं स्वाहा०—॥

पद १५ वें संवादः—

( बाप व मुलगा बोलत बसले आहेत इतक्यांत मुलगी सभेला जाण्याच्या तयारीनें नटून थटून येते, )

बापः—तूं नटुनि चाललिस सांग तरी गे कोठें ?॥ हा नटवा बघुनी गूढ पडे मज मोठें ॥ १ ॥ सर्व काम घरचें तसेंचि टाकुनि मागें ॥ चाललीस कोठें श्रृंगारुनि फिर मागें ॥ २ ॥

मुलगीः—हां:! पुरें करा हो तुमचें बडबडणें हें॥ ( रिस्ट-वॉच पाहून )—मज उशिर जाहला सभेसि जाण्या पाहिं ॥ ३ ॥ हा नीटनेटका पोषाख जरी ल्यालें तरि सांगा मजला काय वावगें झालें ॥
( आरशांत पाहून )—हा भांग असा उलटाचि पाहुनी मजला ॥ स्वमुखातें बघुनी तोष सांगुं किति झाला ॥

मुलगीः— ताई हें वदसी काय असें मज न कळे॥ शिक्षणें हेंच कां उन्नत तव मन झालें ॥ वडिलांना सगळें समजावुनि सांगावें ॥ कां उगाच ऐसें फटकारुनि वागावें ॥

बापः—काय कारट्या या बेफाम अर्जी झाल्या ॥

हें सर्व चोचले करितां लाजा सरल्या ॥ करित त्या अवज्ञा थोर जनांची सहजीं ॥ मन मानिल तैसें राहति पोरी आर्जी ॥ हा सारा प्रताप वाटे मज शिकण्याचा ॥ म्हणुनि फार बोलें चुरुचुरु ही वाचा ॥

**मुलगीः**—काय या बिचाऱ्या शिकण्यानें हो केलें॥ सांगा मज तुमचें घोडें कां मारियलें ॥ तुम्हि पुरुष जाहला अप्पलपोटे भारी ॥ समसमान हक्का आम्हि मिळवुं निरधारी ॥

( चाल ) आम्हींच रहावें सांगा कां घरीं ॥ कारणें वदाहो यांची सत्वरीं । माणसेंच आम्ही नाहीं कां तरी । तुम्हि पुरुष गुलामा परी आम्हां वागवितां । चालेल यापुढें तुमची मुळिं नच सत्ता ॥

**मुलगाः**—कर्तव्य सदोदित करणें राहे दूरि । परि तुजसम नटुनी उगाच फिरती नारी ॥ देशकार्य नुसतें नटुनी होत न ताई । देशकार्य म्हणजे खेळ नसें गे बाई । त्या सभा भरवुनी देशकार्य नच होतें । परि नटुनी मिरविण्या कारण मात्रचि हो तें ॥

**बापः**—गे आर्यस्त्रियांनीं गृहीं सुखें नांदावें । गृहकृत्यामाजीं दक्ष सदोदित व्हावें।गृहशिशूसवें गे आनंदें वागावें । हे सर्व चोचले पार सोडुनी द्यावे ॥

**मुलगाः**—कर्तव्य आजि जें आपुलें तें मनिं आणा देशकार्य करणें नित्य सुहृदयीं बाणा ॥

मुलगी–दुसऱ्याच्या डोळ्यांमधिल कुसळ तें दिसतें। परि अपुल्या डोळ्यांमधिल मुसळ नच दिसतें । भाऊरे मारिसि गप्पा मज मोठाल्या । परि देशकार्य तूं काय करिसि वद मजला । हा भांग कशाला तुला हवा रे भाऊ । हें रिस्ट वॉच तरि चल तें टाकुनि देऊं । कडकडीत कॉलर नेकटॉयचा फांस । कां उगिच लाविशी गळ्यासि हा गळफांस । पुरुषांसि कशाला सिगारेट आणि ग्लास । व्हिस्कीचा नलगे उगाच होईल त्रास । त्या सभा कशाला तुम्हां त्रास तो उगिच। ते क्लबहि कशाला उगाच कंठीं काच ॥

बापः–[ चाल ] कर्तव्य सदोदित धैर्यें तूं करीं । नटण्याचें वेड मनीं मुळि ना धरीं ॥

मुलगीः–मग काय करावें सांगा सत्वरीं ॥

[ दोन सेवक प्रवेश करितात. ]

देशसेवकः–देश हा दरिद्री झाला पैसा नाहीं । उद्योगा करुंया चला सुजनहो कांहीं । देशासि स्थिति ही कठिण आलिसें पाहीं ॥ येउंद्या सुजनहो हृदयासी द्रव कांहीं ॥ दारिद्र्य पाहुणा घालविण्या बाहेरीं ॥ नानाविध देशीं माल करूं हितकारी ॥

बापः–ऐका, बाळांनो देशकार्य करूं लागा। हे ढंग सोडुनी सन्मार्गानें वागा ॥ कर्तव्य आजि जें तरुण पिढीचें आहे ॥ तें करणें आजीं उचित तुम्हांतें

पाहे ॥ नानाविध देशीं धंद्यांना उचलाल ॥ तरिच खास भारत भूमी ही ताराल ॥

मु०व मुलगीः–हें लागलों पहा देशोद्धारां आम्ही॥ सुखद देश करण्या झटूं सदोदित आम्ही ॥ देशी-धंद्याच्या संस्था असती त्यांना !! मदत करूं आम्ही यत्न करुनियां नाना ॥ देशकार्य करितां झिजवूं आपुली काया ॥ तरिच जन्म घेऊनि गेला नच हा वायां ॥ देशकार्य करण्या तत्पर आम्ही राहूं ॥ देशाच्या काजा देह आपुला वाहूं ॥

(सर्व) देशकार्य करण्या त्वरित जन तुम्ही याहो ॥ मातृभुमि वरचें संकट दुरि करण्या हो ॥ मातृदेश करूं हा उज्वल आजीं जगतीं ॥ कीं सर्वहि राष्ट्रें गातिल याची महती ॥ या वसुंधरेच्या सुंदरशाया भालीं ॥ तिलकासम करूं हा हिंद देश या कालीं॥ ( चाल ) या चला देश कार्या हो । या चला ॥ संपन्न देश करण्यातें आपुला ॥ हा काळ खास भाग्याचा पातला ॥ या बंधु भगिनिनो । सत्वरि देशोद्धारां ॥ कवि ' मित्र ' विनवितो भारतभूतें तारा ॥

पद १६ वें

देशोद्धारां बंधूंनो सगळे लागा सत्वरी ऐशा समया॥ध्रु०

[illegible]ाते कूदशाही आजि आली । कोणी ना त्यासि

वाली या तारा, उद्धारा, क्लेशहरा ॥ १ ॥ या कार्या बंधुंनो या वाहुं काया । झणें संकट नेऊ विलया । करुनि त्वरा । दैन्य हरा । भू तारा ॥ २ ॥

पद १७ वें

हिंदीयांनों ! बोला हो बोला तुमचें शौर्य कुठें गेलें ॥ ध्रु० ॥ परक्यांनीं द्रव्य सारें लांबविलें । खायाला अन्न लवही नाहीं उरलें । घोरुं नका, वेळ फुका, दवडुं नका ॥ १ ॥ दासाचा शेट आतां येथ झाला । अन्यायी न्यायि ऐसा न्याय ठरला । याकालीं । वन- माली । तूं वाली ॥ २ ॥

पद १८ वें

ध्या वाचे मधुनाम मोरयाचें । गणराया सुरवरा । असुरहरा । गणपतिला स्मरा । मनि साचे ॥ध्रु॥ हेरंभ मुषक वाहना । सिंधुरादि अरिदमना । सतत हो स्मरा स्वमना । भय हरिता मोरया । करिल दया । झडकरि या स्मरा । नित्य वाचें ॥ १ ॥

पद १९ वें

चल ऊठ आत्मयज्ञास भारता । सोड सोड जीव ओढ जागें कोण अमर रे झाला । कां भीसी मग मरणाला । वल ऊठ घालण्या घाला ॥ भारता ॥ १ ॥ महाराष्ट्र पूर्वी गाजविला । कीर्तिनें अमर तो झाला । दवडिसी काय कीर्तिला ॥ भारता ॥ २ ॥ देशांत दृष्टि ही फेक । मारितें राष्ट्र तुज हांक । बघ छळिति तुला हे [illegible]क

॥ भारता ॥३॥ मांडिला जातिचा भेद । वाटे न तुला मुळिं खेद। कां व्यर्थ करिसि हा वाद ॥भारता॥ ॥४॥ स्मर मनीं बाळ टिळकास । त्या अनभिषिक्त भूपास । करि पहिला दुहिचा घास ॥ भारता ॥५॥ ही नोकरशाही माया । लाविते झुंज खेळाया । बंधूची येउंदे दया ॥ भारता ॥ ६ ॥ जरि धरिशि जीवाची ओढ । स्वातंत्र्यआशा मग सोड। परदास्य बिडी ती तोड ॥ भारता ॥ ७ वाढला सिंह कळ-पांत । गर्जना न ऐकूं येत । चल ऊठ गिरीं कुहरांत ॥ भारता ॥८ ॥ जन तीसकोट बेजार । हे करी न्यायें सरकार । त्या नसे मुळीं दरकार॥भारता॥९॥ ऐक्याचें देई मोल । भेदभाव सोडी फोल ॥ जय हिंदु-मुसलमिन् बोल ॥भारता ॥१०॥ हा समर्थमेळा प्रार्थी । बनुं नको असा तूं स्वार्थी । दे प्राण तुझ्या राष्ट्रार्थीं ॥भारता॥११॥

पद २० वें

सुजन हो, मदत द्या आज। स्मारका लोकमान्यांच्या ॥ ध्रु. ॥ परदास्य पंकीं रुतलेली । निजभिमान विसरुनि गेली । जनता जैं जागी केली । त्या संजीवन दात्याच्या ॥

पाश्चात्य संस्कृती नटवी । लव आर्य पुत्र हे भुलवी । परि क्षणें त्या सुमार्ग दावी । त्या राष्ट्रसूत्रधाराच्या ॥

संकटीं पाहुनी जनता। धांवुनि पुढें दे हाता ।
वारिलें दीन जन दुरिता । त्या लोकपाल पुरुषाच्या॥३॥

शिवजन्म महोत्सव करुनी ।इतिहास बांधवां कथुनि ।
स्वाभिमान जागृत स्वजनीं । करी त्या बुध राष्ट्रगुरुच्या
आजन्म स्वदेशासाठीं । लढला जो करुनि छाती ।
कष्टांची तिळही न भीती । धरिली त्या बाल तिलकांच्या
ते शठम् प्रती शाठ्यमचें । बोधिलें सार गीतेचें ।
वर्म वा कर्मयोगाचें । त्या कर्मयोग-कर्त्याच्या ॥ ६ ॥
त्या राष्ट्रवीर पुरुषांचें । स्मारका साह्य करण्याचें।
योजिलें, म्हणुनि मदतीचें। मागणें बंधुनो तुमच्या॥७॥
अगणीत ऋणांतुन कांहीं । अल्पांश फेडु मनिषाही ।
स्मारका फूल पाकळीही । वाहुनी पदाब्जीं त्यांच्या॥८

## पद २१ वें.

प्रभु देईल सौख्य नताला ॥ धृ० ॥ लीना अकरुण होईल कैसा । पालक जो जगताला ॥ १ ॥ प्रेमभरानें आळवितां हरि । देईल स्वराज्याला ॥ २ ॥ अर्पियली जरि ही तनु, करुणा । येईल का अधमाला ॥३॥

## पद २२ वें.

पातलि मंगल वेला । होत प्रमोद मनाला ॥ ध्रु० ॥
जन सारे हे प्रेमभरानें । गाती गणरायाला ॥ १ ॥
कोण अभागी । दुःखी ही परि । ऐशा या समयाला॥२
हिंद भूमि ही । कष्टी दिसते । देखाया अबलेला ॥ ३ ॥
परदास्याच्या । पंकीं रुतली । मुक्त करा । मातेला ॥४॥

पद २३ वें.

अरेरारी चाले ही चोहो बाजुनी ॥ ध्रु० ॥
काय करावें कंपनि म्हणे तोटा येतो फार ।
आगिन गाडीचें भाडें वाढवि लोकां करि बेजार ॥१
तिकिट मागतां पैसे घेती पुरे पुरे कलदार ।
बसावयाला जागा नसतां कोण कुणा पुसणार ॥२॥
हॅट घालितां मिळते जागा मान मरातब फार ।
गरीब कोणी दाद मागतां धक्याचा भडिमार ॥ ३ ॥
प्रजा भुकेली तिला खावया घांस न मिळती चार ।
जो तो उठतो तिची कराया गांजणूक अनिवार ॥४॥
दीनदयाळू न्यायनीतिपर मायबाप सरकार ।
हाच कां असे तद्राज्यांतिल न्यायाचा बाजार ॥५॥
हिंद पुत्रहो सूज्ञ तुम्ही जर उमगा यांतील सार ।
लोकमान्य पदयुगुल पुजोनि करुं या देशोद्धार ॥६॥

पद २४ वें.

'जगो भारत सुनो बातें । पडे हो व्यर्थ क्यों बेगम
जपो इस मंत्रको मनमें । हमारे तुम तुमारे हम ॥
मही निर्गंध हो नभभी । कभी निःशब्द हो जावें
तथापि हम रहें हंसते । मिलायें हाथको हरदम ॥
पढो इतिहास यदि अपना । खुलेगीं आपकी आंखें
तुरत यह ज्ञान सच्चा हो । किसीसे भी न हम थे कम ॥
कभी निःसत्व या दुर्बल । न समझो आप अपने को

अविद्या ग्रस्त होनेसे । वृथा कुछ हो गया है भ्रम ॥
करो उद्योग निर्भय हो । निराशा कौन चिड़िया है
हमे उन वंशके धारी । जिनोंसें कांपता था यम ॥
करोडों मिट गये तारे । हवा चलती प्रभाती है
न सोनेका समय यह है । जगत्से हट चला है तम ॥

पद २५ वें

हमे विश्वास है भारतका । दिन भी फिरने वाला है ।
हमारें आज बच्चोंने भी । होश अपना संभाला है ॥
बहुत दिन हो चुके हमको । अंधेरी रातमे सोते ।
मगर जल्दी ही परदा आंखका अब हटने वाला है ॥
भ्रम घबराता है क्यौं कर समय थोडा ही बाकी है ॥
निकल आया है सुरज अब कमल भी खिलने वाला है॥
मिलेंगे हाथ यह सुनकर । बिचारे तंग दिलवाले ।
सुनहले बादलों सें आसमां यह घिरने वाला है ॥
जिगर हो जायगा रौशन । अंधेरा बे निशा होगा ।
मिलेगा खुदबखुद यारो जो तुमको मिलने वाला है ॥

पद २६ वें.

अहो भगवन् दया कीजे, कि भारत भी स्वदेशी हो ।
हमारा भाव-भूषा-वेष, तन मन सब स्वदेशी हो ॥
चले घर घर पुनः चर्खे, शुरु हो काम कर्घोंका ।
बने गाढा-गजी मलमल सिटिन साटन स्वदेशी हो ॥
तजे सब देश बांधव गण, नकल फेशन विदेशी की ।

पुरानी मिर्जई कुरता, अंगरखा भी स्वदेशी हो ॥
स्वदेशी न्याय न्यायालय स्वदेशी न्यायकारी हो ।
हमारा कायदा कानून, भी जारी स्वदेशी हो ॥
स्वदेशी हो पुलिस अपनो स्वदेशी फौज औ अफसर ।
स्वदेशी हुकम औ हाकिम, हुकूमत भी स्वदेशी हो ॥

पद २७ वें.

ધન્ય છે ધન્ય વીર ગાંધી
મહાત્મન્ ધન્ય ધન્ય ગાંધી
લોકમાન્ય દિવંગત થાતાં યુગ ગાંધીનો આવ્યો
મહારાષ્ટ્ર મ્હોં મચકોડે પણ અન્ય જનોને ભાવ્યો ॥
॥ ધન્ય૦ ॥
વણિક વૃત્તિની સત્તા સામે વણિકવિદ્યા અજમાવી;
અસહકાર આદરવો એવી સાદી વાત સમજાવી ॥
॥ ધન્ય૦ ॥
છપન્ન કોટિ ધન જાય દેશથી થાય પૂરી બરબાદી;
આઝાદીનો માર્ગ બતાવ્યો ચરખો ને વળી ખાદી ॥
॥ ધન્ય૦ ॥
કરો એકતા હિન્દુ-મુસલમાં-પારસી સીખ ઈસાઈ;
દોડી આવે સ્વરાજ્ય પળમાં ઘર બેઠે પ્રિય ભાઇ ॥
॥ ધન્ય૦ ॥

पद २८ वें,

हिंदांनों त्रस्त झाला । व्हा जागे आतां ॥ धृ० ॥
एक जुटीनें कार्य करा हो । जातीचा भेद सोडा ॥ १ ॥
वेळ पातली स्वातंत्र्याची । समरीं त्या उडी घाला ॥ २ ॥
बलवंताचा मार्ग आचरा । राष्ट्रार्थीं प्राण द्यावा ॥ ३ ॥
भो पिंगाक्षा तूंचि आमुचा । कैवारी पाठिराखा ॥ ४ ॥

पद २९ वें.

विनति चरणीं गोपाला । क्षमा व्हावी बाला ॥ धृ. ॥
गरिब हे बहु गांजले । अपराध नाकळे । अधम असले ।
जिणें कसलें । आम्हा दिधलें । रमा-कांता ॥ १ ॥

आरती

गणराय भवभय कंदना ॥ तुज आरती शिवनंदना॥धृ
विघ्न हरीं गिरिजा सुता ॥ उपदेशीं या दीन जना ॥
षडरीं बहू छळती आम्हां ॥ तूं तारि रे शिवनंदना॥१
मूषक घेउनि वाहना ॥ धांव अरी संहारका ॥
विघ्ननाशना श्रीगजवदना ॥ पाव आम्हां या बालकां॥२
गजवदना हे अज्ञ जन तुला ॥ संकटकालीं पूजिती ॥
समर्थ मेळा हा तुला ॥ ओंवाळितो ही आरती ॥ ३ ॥

REFBK-0000284

प्रकाशकः--दिगंबर पांडुरंग बापट, १९८ शुक्रवार. पुणें सिटी.
मुद्रकः—शंकर नरहर जोशी सदाशिव पेठ,
१०२६ चित्रशाळा प्रेस. पुणें.

पदांचा मालकी हक्क मुलामुलींच्या 'समर्थ मेळ्या' नें
ठेविला आहे. लोकमान्य टिळकांच्या स्मरणार्थ उभा
रलेल्या समर्थ मेळ्याचा हा पद्यहार हिंद मातेला
अर्पण असो.

येथें टाईप-रायटिंग व शॉर्ट-हॅन्ड माफक दरानें शिकविलें जातें. तसेंच कोर्टासंबंधीं सर्व तऱ्हेचीं कामें टाईप-राइट करून दिलीं जातील.

# ग्राहकांस इशारा

## देसाई यांचें ग्यासचें बत्त्यांचें दुकान पुणें, बुधवार, जोगेश्वरी जवळ नसून मोरोबा दादा फडणीस यांचे वाड्यासमोर आहे.

आमच्याकडे ग्यासच्या बत्त्या व ग्रामोफोन सवलतिच्या भाड्यानें मिळतील व करार केल्याप्राणें गिऱ्हाइकांचे घरीं बत्त्या योग्य रीतीनें जळतात अशाबद्दल काळजी घेतली जाते. तसेंच नवे स्टोव्हज माफक दरानें विकत मिळतात. जुने सवलतीनें व काळजीपूर्वक रिपेअर केले जातात. या सर्वांस लागणारे सुटें सामान माफक दरानें विकत मिळतें.